# ऑडिओ पुस्तकांकडे वाढतोय तरुणांचा कल

म. टा. प्रतिनिधी, पुणे

दुकानात जाऊन पुस्तके खरेदी करणारी तरुण मंडळी अलीकडे दिसत नाहीत, म्हणजे त्यांचे वाचन थांबले आहे, अशी टीका करणाऱ्यांचा गैरसमज जागतिक पातळीवर काम करणाऱ्या ऑडिओ बुक कंपन्यांनी दूर केला आहे. हातात पुस्तक घेऊन वाचण्याऐवजी हेडफोन लावून पुस्तक ऐकणारे वाचक वाढले आहेत. यामध्ये १८ ते ४९ या वयोगटातील वाचकांची संख्या सर्वाधिक असून दरवर्षी पुस्तके ऐकणाऱ्यांचे प्रमाण गेल्या दोन वर्षांत दुपटीने वाढले आहे. या वर्षी ऑडिओ पुस्तकांची बाजारपेठ रेकॉर्ड ब्रेक करणार असल्याचे या ऑडिओ बुक कंपन्यांनी जाहीर केले आहे.

## पुस्तके ऐकणाऱ्यांचे प्रमाण दोन वर्षांत झाले दुप्पट

युरोप, अमेरिकेसह प्रगत देशांमध्ये ऑडिओ पुस्तके यापूर्वीच आली असल्याने तेथील तरुण पिढीही या पुस्तकांची चाहती आहे. भारतामध्ये गेल्या दोन वर्षांत ऑडिओ बुकचा प्रसार झाला असून तरुणांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे. स्नोवेल, बुकगंगा संस्थांबरोबरच यांसह काही पुस्तक प्रकाशकांनीही आता त्यांची मराठीतील पुस्तके ऑडिओ माध्यमातून वाचकांसमोर सादर करण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये १८ ते ४९ या वयोगटातील वाचकांचा सर्वाधिक समावेश आहे. ऑडिओ पुस्तकांमध्ये वाचकांना मुख्यतः कथा, कांदबऱ्या, रहस्यमय गोष्टी, प्रेरणादायी जीवनचरित्रांना अधिक प्राधान्य मिळते आहे.

### आंतरराष्ट्रीय कंपन्या दाखल

भारतातील ऑडिओ बुकची वाढती बाजारपेठ ओळखून गेल्या दोन वर्षांत अनेक पुस्तक प्रकाशन संस्था, पुस्तकांची ऑनलाइन विक्री करणाऱ्या कंपन्या या नव्या माध्यमात उतरल्या आहेत. आंतरराष्ट्रीय कंपन्यांनीही भारतातील तरुणांचे प्रमाण लक्षात घेऊन येथील पुस्तक बाजारपेठेत पदार्पण केले आहे. स्वीडीनमधील अग्रगण्य 'स्टोरीटेल' या कंपनीने सहा महिन्यांपूर्वीच हिंदी आणि मराठी भाषेत ऑडिओ बुक तयार करण्याचे जाहीर केले आहे. यासाठी मोठा समारंभही पुण्यात आयोजित केला होता. गुगलनेही गेल्याच महिन्यात ऑडिओ बुकमध्ये पदार्पण करीत असल्याचे जाहीर करून भारतासह ४४ देशांत ९ भाषांमध्ये पुस्तके उपलब्ध केली आहेत. ॲमेझॉन कंपनीही सहा महिन्यांत त्यांचेही ऑनलाइन ऑडिओ बुक स्टोअर सुरू करणार आहे. प्रथम बुक्सने मुलांसाठी काही महिन्यांपूर्वी मिस कॉल द्या आणि ऑडिओ गोष्टी ऐका असा उपक्रम राबवला होता. त्या वेळी तब्बल पन्नास हजार मुलांनी गोष्टी ऐकल्या.

### ऑडिओ बुकची वैशिष्ट्ये

- पुस्तक वाचनात रंगवलेल्या पात्रांमुळे उत्सुकता वाढत जाते.
- पार्श्वसंगीत, साउंड इफेक्ट, निवेदनामुळे रंजकता वाढते.
- प्रवासामध्ये, काम करताना, गाडीत बसल्यावर कोठेही सलग पुस्तक ऐकता येते.
- रात्री अनेकांना पुस्तक वाचायचा कंटाळा येतो, त्यापेक्षा ऐकताना छान वाटते.
- लहान मुलांची पुस्तके अधिक रंजक आणि करमणूकप्रधान वाटतात.



**जागतिक पुस्तक दिन विशेष**

आतापर्यंत आम्ही १२३ ऑडिओ बुक केली असून काहींचे काम सुरू आहे. आम्ही केलेली बहुतांश ऑडिओ पुस्तके लेखकांच्या आवाजातच रेकॉर्ड केली आहेत. इंग्रजीतील शिक्षणामुळे मराठी वाचता येत नसलेल्या मुलांना त्यांचे पालक ऑडिओ बुक ऐकवतात. तरुणांबरोबरच ज्येष्ठ नागरिकही बुकगंगाचे ॲप्लिकेशन डाउनलोड करून ही पुस्तके ऐकत आहेत.

– गौरी बापट, ऑडिओ बुक विभाग, 'बुकगंगा'

एक प्रयोग म्हणून २००८मध्ये आम्ही पहिले पुस्तक ऑडिओ माध्यमातून पुढे आणले. त्या वेळी परिचयातील लोकांना हा प्रयोग सगळ्यांना खूप आवडला. सर्वच वयोगटातील वाचकांना ही पुस्तके आवडत आहेत. साहस कथा, गूढकथांबरोबरच हलक्या फुलक्या विषयांवरील कथांनाही चांगला प्रतिसाद आहे.

– अनिरुद्ध जोशी, स्नोवेल कंपनी